*कथा क्रमांक ४*

# ही वाट दूर जाते....

संध्याकाळची वेळ - पावसाची रिपरिप संपून आता चांगलाच कोसळू लागला होता - हातातल्या पिशव्या सांभाळत तिने चावीने घराचं दार उघडलं आणि दारासमोरच पडलेल्या बिलांचा गठ्ठा बघत ती पुटपुटली .."आज एक तारीख नाही का !! gas बिल , maintenance बिल , इलेक्ट्रिक बिल , हि बिल कशी अगदी न  चुकता वेळेवर येतात ..मग  बाकी अनेक गोष्टी वेळेवर होवोत नाहीतर न होवोत , कोणाला काय फरक पडतो "! आधीच तिच्या हातात सामान , त्यात ओली छत्री , पूर्ण भिजलेली ती , आणि त्यात हे देणेकरी ..तिची स्वतःवरची चिडचिड जरा अधिकच वाढली .ओली छत्री बेसिन मध्ये ठेवत ती तश्याच ओल्या कपड्यात आलेली बिले  न्याहाळू लागली. ग्ठ्यात एक कुरिएर हि होतं , लंडन हून आलेलं. अरेच्या कुरिअर  वाल्याने हे कुरिअर असं कसं आत टाकलं , ना पावती ना सही तिच्या मनात विचार आला आणि क्षणातच त्याचा उलगडा हि तिलाच झाला . शेजारच्यांनी घेऊन सही करून आत टाकलं असणार नेहमीप्रमाणे . तिने एक उसासा टाकत परत पुटपुटायला सुरवात केली , " आता मी एकटी आहे , एकटी राहते त्यात माझा काय दोष ..सगळे आजूबाजूचे लोक अशी वागणूक देतायत जणू काही मी खूप मोठा अपराध केलाय ..जाऊदे . शेवटी जग कितीही पुढे गेले तरी इथल्या लोकांचे स्वभाव , त्यांच्या भावना काही इतक्यात सुधारणार नाहीत ".ह्या तिच्या पुटपुटण्याची एव्हाना त्या घरालाहि सवय झाली होती .डोळे मिटून , डोके टेकून ती तशीच सोफ्यावर बसून राहिली. कपडे पूर्ण भिजले होते , गरम गरम आलं घातलेल्या चहाची नितांत गरज होती पण ती तशीच बसून राहिली , भूतकाळात हरवून गेली .
लहान पणापासूनच कोणाच्या सांगण्यावरून काही करणे तिला मान्य नसे .तिच्या बुद्धीला आणि मनाला पटेल तेच ती करायची . ह्याच तिच्या स्वभावामुळे तिने college  मध्ये असतानाच ठरवून टाकले नोकरी करणार नाही , कोणाच्या हाताखाली काम करणार नाही. म्हणूनच आर्ट्स ची डिग्री हातात पडताच तिने fashion designing चा डिप्लोमा हि पूर्ण केला होता आणि स्वतः चे एक छोटेसे दुकान थाटले होते . अफाट जिद्द ,प्रचंड कलात्मकता व सौंदर्य दृष्टी ह्यांचे वरदानच असलेल्या रुहीला ह्या धंद्यात जम बसवायला वेळ लागला नाही . आणि एक दिवस बघता बघता तिचे 'dreams unlimited ' हे boutique सुरु झाले .

तिच्या boutique मध्ये नव वधूचा पेहेराव कसा असावा , दागदागिने कसे असावेत , नवरदेवाचे कपडे कोणत्या रंगाचे असावेत ह्याबद्दल मार्गदर्शन व desigining होत असे.ह्या व्यवसायात तिला अजून तरी कोणी प्रतिस्पर्धी आला नव्हता .इतकी प्रसिद्धी , नाव लौकिक , घर , गाडी अश्या सर्व काही सुख सुविधा असतानाही ती मात्र असमाधानी होती..घडून गेलेल्या काही चुकांवर आतल्याआत कुढत होती .

Fashion Designer's story ( Story No. 4_2 )

तिच्या आयुष्याचे दोन भाग झाले आहेत हे तिला फार प्रकर्षाने जाणवू लागले होते. तिच्या कामाच्या वेळेत तिच्या नोकरवर्गाशी आणि ग्राहकांशी असलेले तिचे संबंध केवळ व्यावसायिक स्वरूपाचे होते. त्यातील वरवर दिसणारे सौहार्द टिकवणे ही दोन्ही बाजूंची व्यावहारिक गरज होती. पण त्यापलीकडे जाऊन कोणी तिच्याशी व्यक्तिगत जवळीक साधायला उत्सुकच नव्हते. सुरुवातीला जेव्हा ती तारुण्याच्या जोमात होती तेव्हा तिला कोणाच्याही मैत्रीची गरज वाटत नव्हती. किंबहुना मैत्रीचा हात कोणी पुढे केला तर त्याची उपेक्षा करण्यात तिचा अहंकार सुखावत असे. आता बाजू उलटली होती. आता या परिस्थितीचा उगम आपल्या स्वभावात आहे हे तिला जाणवू लागले. त्या स्वभावाची घडण ज्या बालपणात झाली त्या काळात तिने नकळत प्रवेश केला.

बाबा सरकारी नोकरीत बड्या पोस्टवर होते. घरातही ते ऑफिसमध्ये असल्यासारखेच वागायचे. घरी आलेला फोनही प्रथम आईनेच घ्यायचा आणि त्यांची त्या व्यक्तीशी बोलायची इच्छा असेल तरच तो त्यांना द्यायचा हे नाटक तिच्या नजरेसमोर रोज चालू असायचे. त्यांचा अहंकार कुरवाळण्याचा हा प्रकार मनात शिसारी आणत असे. त्यांच्याशी बोलणे हा संवाद नसायचाच. त्यांचे फक्त ऐकून घेणे व त्यांना आवडतील अशीच उत्तरे देणे हेच इतरांचे कर्तव्य असायचे. आईला त्यामुळे स्वतःचे असे काही व्यक्तिमत्वच राहिले नव्हते. मुळात ती लीडर नव्हतीच. ती एक जन्मजात अनुयायी होती. त्यात बाबांनी तिला केवळ घरातील सेक्रेटरी व केअरटेकर करून टाकले होते. आई पण त्यांच्यावर असलेल्या श्रद्धेमुळे आणि त्यांच्या दबावाखाली कायम खालमानेने वावरत असे. या अशा वातावरणामुळे तिच्या मनात हुकुम फर्मावणाऱ्याविषयी तसेच ते मुकाट्याने ऐकून घेणाऱ्याविषयी चीड निर्माण झाली. तेव्हाच कोणाचे ऐकून घेणे या प्रक्रियेलाच ती शत्रू मानू लागली. मन बंड करून उठायचं. तिने इंजिनियर व्हावे, नंतर जी.आर.ई. देऊन अमेरिकेत एम. एस. करावे असा हुकुम बाबांनी अनेकवेळा फर्मावला होता. त्या त्या वेळेला ती प्रयत्नपूर्वक गप्प बसली. पण मनात बंडाचे वादळ घोंगावत होते. तिने धारण केलेले मौन ही एका भयानक वादळापूर्वीची शांतता होती. त्या प्रत्येक हुकुमाने तिच्या मनातील त्या बंडाच्या आगीत तेल ओतले होते. केवळ त्या सतत दिलेल्या हुकुमाची तीव्र प्रतिक्रिया म्हणून आणि कोणाचा हुकुम ऐकण्याचा प्रसंगच नको म्हणून तिने Fashion Designer होण्याचा ठाम निर्णय घेतला. अर्थातच घरात बाबांनी आकांडतांडव केले. ते पाहताना तिच्या मनात एका आसुरी आनंदाला उकळ्या फुटत होत्या. त्या उद्रेकापुढे ती स्वतः मक्ख राहिल्यामुळे ते सगळा राग आईवर काढत होते व आई देखील स्वतःच अपराधी असल्यासारखी गोरीमोरी झाली होती. तिला तर आई आणि बाबा या दोघांचीही कीव येत होती. त्या वादळानंतर एक फार बरे झाले. ते म्हणजे बाबांचा व तिचा संपर्कच संपला आणि त्यांना राग येईल या भीतीने आईचे व तिचे संभाषणही केवळ कामापुरते राहिले.

या सर्व घटनांनी मनाला व वृत्तीला पडलेले पीळ इतके घट्ट झाले की आपला जोडीदार निवडण्याची वेळ आयुष्यात एक ठराविकच असते या वस्तुस्थितीचे भान तिला राहिले नाही. प्रपोज्ड विवाह ठरवताना ज्या प्रसंगांना सामोरे जावे लागते ते तर तिला पटणारे नव्हतेच. त्यामुळे तो पर्यायच निकालात निघाला. परंतु नियती संधी एकदाच देते हेही ती विसरली. ज्या आर्ततेने पियुषने तिला प्रपोज केले होते त्या भावनेचा अव्हेर करून तिने आयुष्यात काय गमावले याचा विचार ती आता करू लागली.

विचार करता करता डोळा कधी लागला हे तिला कळले सुद्धा नाही. जाग आली तेव्हा सकाळचे सात वाजले होते. का कुणास ठाऊक पण आज तिला खूप प्रसन्न वाटत होते. म्हणूनच पुन्हा भूतकाळात कधीही न डोकावण्याचा निर्णय तिने ठाम केला. नेहमीच्या सवयीनुसार रूही चहा घेत घेत वर्तमानपत्र चाळू लागली आणि अचानक तिची नजर कोपऱ्यातील एका बातमीवर खिळली. ज्या शॉपिंग कॉम्प्लेक्समधे तिचे बुटीक होते, ते कॉम्प्लेक्स अनधिकृत असल्यामुळे जमीनदोस्त करण्याचा आदेश सरकारने दिला होता. बातमी वाचतच रूहीने ज्या एस्टेट एजन्टतर्फे बुटीक विकत घेतले होते, त्याला संपर्क करण्याचा प्रयत्न केला. अपेक्षेप्रमाणे त्यानेही फोन उचलला नाही. दामले वकीलसुद्धा कामानिमित्त शहराबाहेर होते आणि त्यांना परतायला अजून दोन दिवस तरी लागणार होते. तिचे सगळेच प्रयत्न निष्फळ ठरले होते.

संपूर्ण बळ एकवटून रूही बुटिकमधे जायला निघाली खरी, पण कॉम्प्लेक्सवर होणाऱ्या सरकारी कारवाईमुळे आज बुटीक उघडता येईल की नाही अशी शंका तिला सतावत होती. शॉपिंग कॉम्प्लेक्स जवळ लोकांची गर्दी जमली होती. कुणी घोषणा देत होते, तर कोणी कॉम्प्लेक्सच्या मालकाला शिवीगाळ करत होते. संपूर्ण शॉपिंग कॉम्प्लेक्सला पोलिसांनी वेढा घातला होता. काही NGO’s सुद्धा निषेधार्थ उपस्थित होते. समोरची परिस्थिती पाहून रूही थोडीशी भांबावून गेली. स्वकष्टावर उभे केलेले बुटीक आता जमीनदोस्त होणार या विचाराने तिच्या डोळ्यात अश्रू तरळू लागले. कुणाच्याही हाताखाली काम करणार नाही अशा हट्टी व्यक्तिमत्वाच्या रूहीला आज कोणाच्यातरी आधाराची गरज भासत होती. खिन्न मनाने तिची पावले घराकडे वळली. आता पुन्हा एकदा तिला शून्यातून जग निर्माण करायचे होते. जिद्द आणि कलात्मकता याच्या साथीने भरारी घ्यायची होती पण मार्ग सापडत नव्हता. इतक्यात तिची नजर टेबलावरील लंडनहून आलेल्या कुरियरकडे गेली . कामाच्या व्यापात ते कुरियर उघडायचे रूही पूर्णपणे विसरून गेली होती. लंडनमधील एका नामांकित फॅशन डिझाइनरकडून ते कुरियर आले होते. काही महिन्यांपूर्वीच रूहीने तिची डिझाइन्स त्यांच्याकडे पाठवली होती. तिचे काम आवडल्यामुळे लंडनमधील आपल्या बिझनेसमध्ये पार्टनरशिप करण्याची ऑफर देऊ केली होती. निर्णय कळविण्यासाठी तिला तीन दिवसांची मुदत दिली होती. पण आज एक आठवड्यानंतर रूहीने कुरियर उघडले होते.

" छान ! तिकडे माझे बुटीक जमीनदोस्त होतय आणि इकडे या लंडनच्या कंपनीचीही मुदत निघून गेली. पुढे काय काय होईल प्रश्नच आहे." तिच्या मनात आले.

कोणाशी बोलावं म्हटलं तर तिला खास मित्रमैत्रिणी नव्हत्याच. तसं तिचं कोणावाचून कधी अडलं नव्हतंच. 'आपण म्हणू तीच पूर्व दिशा ' या अहंकारी वृत्तीमुळे कोणाचं एवढंही ऐकून घ्यायची तिची तयारी नसायची. विचारात असतानाच तिचा मोबाईल वाजला. आई होती फोनवर. आईलाही रूहीचे बुटीक जमीनदोस्त होणार असल्याची बातमी कळली होती.
" अग, काय ऐकतेय मी हे रूही? काय ठरवलंयस तू? दुसरीकडे जागा शोधणार आहेस का? " आई विचारत होती.
"अजून काहीच ठरवलं नाहीय् मी. पण तू काळजी करू नकोस. मी पाहून घेईन." रूहीला स्वतःलाच आपल्या या शांत स्वराचे आश्चर्य वाटले.
" तुझी ती ओळखीची फॅशन डिझायनर - भैरवी, तिच्याशी बोलून पाहतेस का? बघ काही मदत होईल तिची." एरवी गप्प असणारी आई आज वेगळ्या मूडमध्ये होती.
" आई मला नाही कोणाच्या मदतीची जरूर. उपकार नकोयत मला कोणाचे." रूही तटकन् बोलली.
" रूही, काय बोलते आहेस हे? अग, आपण सगळेच प्रत्येक क्षणाला किती किती लोकांच्या उपकाराच्या ओझ्याखाली जगत असतो. कोणीतरी इलेक्ट्रिसिटी शोधून काढली, कुणीतरी चाक शोधून गाड्या तयार केल्या, कोणी मोठमोठे कारखाने काढून उपयोगाच्या वस्तू तयार केल्या – यादी न संपणारी आहे ही. आपलं रोजचं आयुष्य इतकं सरळ, कमी कष्टाचं झालंय, यात या कितीतरी अदृष्य व्यक्तींचे उपकार आहेत आपल्यावर. ' उपकार घेत नाही ' अशी घमेंड काय कामाची? " आज आईला बोलायचे बळ आले होते.

रूहीने फोन ठेवला. लॅपटॉप उघडून फेसबूकवर नवीन टाकलेल्या कुर्तीच्या illustrations ना किती likes मिळाले ते पाहून घेतले. तिने वेळ खर्चून डिझाइन केलेल्या तिच्या कुर्तीचं कोणाला फारसं कौतुक वाटल्याचं दिसलं नाही. जेमतेम 3-4 likes होते. त्याउलट एका "आज मस्त लिंबे मिळाली " या पोस्टवर 20-25 likes आणि "if you’ve lemon, make lemonade " पासूनचे कितीतरी कॉमेंटस्. सहज चाळा म्हणून रूहीने गूगलवर ' फॅशन डिझाइनिंग ' ला पर्यायी करियर शोधायचा प्रयत्न केला. फॅशन मार्केटिंग, फॅशन रायटींग असे काही पर्याय दिसले. शेवटी कंटाळून तिने टीव्ही लावला. जुना ‘ माय फेअर लेडी ’ चालू होता. रूहीला प्रकर्षाने पियुषची आठवण झाली.
" Will you be my fair lady " पियुषने आर्त स्वरात तिला विचारलेल्या प्रश्नावर ती हसत सुटली होती. तिच्या हसण्यात थोडा हेटाळणीचा अंश होता. स्वतःचे कर्तृत्व, निर्णय घेण्याचे

कौशल्य, महत्त्वाकांक्षी स्वभाव या सगळ्याचा रूहीला फार अभिमान होता.
"I admire your guts " म्हणत तिने त्याला वाटेला लावला होता. पियुष त्यानंतर गाव सोडून गेला.

रूही 'माय फेअर लेडी ' पहात असताना विचारत पडली. खरं तर काय वाईट होते त्याच्यात? दिसायला छान, शिकलेला, एक घरची स्थिती बेताची होती पण मुख्य म्हणजे त्याचं किती प्रेम होत माझ्यावर. रूहीचे उलटसुलट विचार सुरु झाले. तेवढ्यात फोन वाजला.

" रूही, मी पियुष बोलतोय. मी कालच आलोय. तुझ्या बुटिकबद्दल कळले. I want to see you. येऊ का आत्ता? " पियुषचा आवाज इतक्या वर्षांनी ऐकल्यानंतर रूहीचं हृदय धडधडलं. जेमतेम "ये" म्हणून तिने फोन ठेवला. ' पण याला अजून आपली आठवण येतेय की नुसताच भेटायला येतोय ' असा विचार तिला आला. तिने दार उघडंच ठेवलं. पंधरा वीस मिनिटांत पियुष धडकन दर लोटून घरात आला. रूही बघतच राहिली त्याच्याकडे. ' किती रुबाबदार दिसतोय हा ' मनात आलं तिच्या.

पियुष लगेच म्हणाला, " खूप वर्षांनी भेटतोय आपण, नाही? मी तुझा वेळ घेत नाही. I am in rush too. तुझ्या बुटीकबद्दल ऐकलं, जमीनदोस्त होतेय ती जागा. तू काय ठरवलंयस बुटिकमधल्या मालाचं? " पियुष बोलतच राहिला. " I am planning to buy all the businesses there and relocate them. गावाच्या थोडे बाहेर १५ एकर्सची जमीन घेतलीय मी. मॉल बांधतोय मी. Are you interested to make a deal with me for your boutique?"

पियुषचे हे प्रपोज़ल ऐकून रूही चकितच झाली. इतक्या वर्षांनी भेटल्यानंतर इतर काही बोलण्याआधी व्यवसायाचे रुक्ष आणि नीरस बोलणे काढणारा पियुष कसा असेल असाही एक विचार रूहीच्या मनात येऊन गेला. लगेच उत्तर न देता तिने दार लावले व ती दिवाणखान्यातील काउचकडे वळली. तिला आठवले तिच्या आणि पियुषच्या तास न् तास चालणाऱ्या गप्पा. काउचच्या एका कोपऱ्यात ती आणि दुसऱ्या कोपऱ्यात पियुष बसून त्यांच्या गप्पा चालत. काउच तसा लहान, तेव्हा त्यांचे पाय किंवा गुडघे खूप जवळ असत. एक विशिष्ट तऱ्हेची जवळीक किंवा इंटिमसी त्यांना त्या बैठकीतून मिळत असे. तिच्या अंगातून एक गोड शिरशिरी उठली. काउचच्या एका कोपऱ्यात पूर्वीसारखेच बसून तिने पियूषकडे पाहिले. त्याला तिच्या मनातील भाव कळला असावा. एक दीर्घ निःश्वास टाकून तो काउचच्या दुसऱ्या कोपऱ्यात बसला. दोघांचे पाय आणि गुडघे समीप होते. एक उबदार फीलिंग तिच्या मनात दाटून आले. आपल्या हातांना मांडीवर स्थिर ठेवत ती म्हणाली, " तर आता तुला माझ्या बंद होऊ घातलेल्या बुटीकमधील स्टॉक हवा आहे. मी विचारू शकते का ह्या मेहेरबानीचे कारण? "

पियूषचे घारे डोळे रागाने चमकले. तिच्याकडे स्थिर नजरेने पहात तो म्हणाला, " तर, फारसे काही बदलले नाही म्हणायचे! तोच तुटक स्वभाव, तीच गोष्टींना assume करून विपरीत अर्थ काढायची रीत. मला वाटलं होतं की यशाने आणि अडचणींमुळे तू थोडी तरी सौम्य झाली असशील."

रूही थोडीशी वरमली. ती म्हणाली, " तसे नाही रे. मी ना सध्या खूप तणावाखाली आहे. आयुष्याचे स्वप्न पूर्ण व्हायच्या भरात असतानाच ही विचित्र अडचण आली आणि मी अगदी गोंधळून गेले आहे. तुझा अपमान करायची माझी इच्छा नव्हती. I am very sorry! "

तिचा हात पुढे होऊन आपल्या हातात घेऊन तो म्हणाला, " ते जाऊ दे. मला हे सांग की तुझा आता प्लॅन काय आहे? आय कॅन हेल्प यू. आय वॉंट टू हेल्प यू."

रूहीने आपला हात पियूषच्या हातातून हलकेच सोडवून घेतला आणि ती म्हणाली, " तू मला विसरला नाहीस मी नकार दिला तरी? होतास तरी कोठे इतके दिवस? "

" काही गोष्टी विसरण्यापलीकडच्या असतात, रूही! काही जखमा भरून येत नाहीत कधीच. तू तेव्हा नकार दिलास तरी तुझी जागा माझ्या मनात तशीच राहिली. दुसरे कोणीच त्याजवळ कधी पोहोचू शकले नाही त्या प्रकारानंतर माझे भारतात रहायला मनच करत नव्हते. मी नोकरीनिमित्त खूप फिरलो. युरोप, यूके मध्ये दिवस काढले. भरपूर पैसा

कमावला. आणि आता ह्या नवीन mall डेवेलपमेंटचा CEO म्हणून मी सूत्रे हाती घेतली. पण ते जाऊ दे. तुझ्या लंडनच्या कंपनीशी टाय-अपचे काय झाले? Is it finalized? " रूहीने त्याच्याकडे चमकून पाहिले. " तुला कसे माहीत आहे हे?" आपल्याशीच हसून ती म्हणाली," कळले बरं, लंडन कनेक्शन्स?"

पियुष मनापासून हसला. तो म्हणाला, " अगं, मी इतका फिरलो तरी तुझ्या 'dream unlimited' वर लक्ष ठेऊन होतो बरं. मला माहीत आहेत तुझी स्वप्ने. आणि अडचणी पण. म्हणून तर मी इथे आलो तुला परत भेटायला." एक दीर्घ निःश्वास सोडून रूही म्हणाली," मी तुझा असा अपमान तेव्हा केला त्याचा राग नाही आला का तुला? आपुलकी इतकी वर्षं टिकते का रे! आणि माझे म्हणशील तर मी ते सर्व केव्हाच विसरून गेले. माझी स्वप्नेच मला पुरेशी सोबत करतात."

तिच्याकडे एकटक पहात पियुष म्हणाला," तुला ते हृदयनाथ मंगेशकरांनी म्हटलेले गाणे आठवते? आपण एकत्र ' भावसरगम ' कार्यक्रम पाहिला तेव्हा आपल्याला आवडलेले?"

भावूक होऊन ती म्हणाली," हाती धनुष्य ज्याच्या, त्याला कसे कळावे, हृदयात बाण ज्याच्या, त्यालाच दुःख ठावे!"

पियुष हसून म्हणाला, " पण हे बाण फक्त प्रेमाचेच नसतात बरं. मला थोडीशी कल्पना आहे तुझ्या स्वभावाची आणि तू लहानपणी कशी वाढलीस त्याची. तुला मी कमी महत्त्वाकांक्षी, नेभळट वाटलो. तू कधी विचार केलास का की तुला कोणीच पुरुष आत्तापर्यंत आपला जोडीदार असावा असे वाटले नाही. तुझी जोडीदाराची व्याख्या खूप कठीण आहे. Can you think, who you are comparing with when you look at your mate?"

पियुषचा हा साधा प्रश्न तिला एकदम धक्का देऊन गेला. खरंच आपण आपल्या जोडीदाराच्या अपेक्षा कुठल्या फूटपट्टीने मोजत आहोत? असा कोण पुरुष आपल्या मनावर असा खोल ठसा उमटवून गेला आहे की दुसरे कोणीच आपल्याला त्या प्रतिमेशी मॅच होताना दिसत नाही?

पियुष तिच्याकडे पहात म्हणाला, " पटतंय का? विचार कर. तुझ्या वडिलांशी तुझं कधीच फारसं पटलं नाही. पण तू त्यांचीच कार्बन कॉपी आहेस काही बाबतीत. तीच धडाडी, तशीच मोठी स्वप्ने, तोच हेकट स्वभाव आणि स्वतः ला सर्वांपेक्षा निराळे समजायची वृत्ती. No one Can beat your dad's image in your mind, Ruhi!"

रूहीच्या डोळ्यात पाणी आलं. तिच्या विक्षिप्त वागणुकीचा तिला उलगडा झाला. ज्या आपल्या वडिलांच्या स्वभावापासून तिला दूर जायचे होते त्याच स्वभावाने तिला 'programmed' करून टाकले होते हे तिला कळले.

ती म्हणाली," थँक्यू पियुष. तुझे आभार कसे मानू तेच कळत नाही. I am my dad's girl! That is true! पण आता खूप उशीर झाला आहे मला बदलायला. मला माझी स्वप्नेच पुढे नेणार आहेत. आणि त्याकरिता मला माझ्या वडिलांच्या रुथलेस स्वभावाचीच गरज आहे. मला तू आवडतोस. तुझी प्रगती आणि प्रगल्भता पाहून मी चकित झाले आहे. You are my best friend. पण मला माझ्या स्वभावाच्या गावाला जाणारी वाट स्वतः लाच हुडकून काढायची आहे. ही वाट भले दूरची असेल पण माझ्या स्वप्नांची आहे."

पियुष तिच्याकडे पहात म्हणाला, " हं, मला याचीच भीती होती. रूही, तू एक स्वयंप्रज्ञ माणूस आणि त्यातून स्त्री आहेस. तुझी वाट तू हुडकशीलच पण एक लक्षात ठेव, तुला मदतीला तयार असणाऱ्या माणसांची कमी नाही. तू केवळ मदत घ्यायला तयार हवीस. आणि दुसरं म्हणजे; आत्ता पण माझी बस चुकलीच म्हणायची!"

पियुषच्या ह्या अर्धवट विनोदी, अर्धवट दुःखी कॉमेंटकडे तिच्या नेहमीच्या स्टाइलमधे दुर्लक्ष करत रूही जागेवरून उठली. पियुषला म्हणाली, "तर मग उठा साहेबजी! आता मला दामले वकिलांच्या मागे लागून त्या डेमॉलिशनला स्थगिती मिळवलीच पाहिजे. आधी त्यांची भेट घेते. मग fax to london office. नंतर मोर्चा भैरवीकडे. तिच्या बुटीकमधे ती माझा स्टॉक काही दिवस display करू शकेल. आणि हो, आमच्या सध्याच्या जागेतील भाडेकरुंचा एक मोर्चा पण काढूया त्या बिल्डरच्या ऑफीसवर. मग कळेल त्याला ह्या भानगडीची किंमत."

रूही कडे अनिमिष नजरेने पहात पियुष उठला. रूहीने त्याचा हात हातात घेत म्हटले, " आणि या सगळ्यातून वेळ मिळाला तर मला तुझी mall ची कल्पना समजावून सांगशील का? मीच तुझ्या त्या mall मधे एक बुटीक काढेन. मग माझ्या स्टॉकची तुला अजिबात काळजी नको. माझ्या स्वप्नांची दूरची वाट तुझ्या mall च्या बाजूने जात असेल. कदाचित माझी स्वप्ने तुझ्या स्वप्नांना पण भेटतील या वाटेवर – कोण जाणे! Let's go!"